प्रसनोट

दि.०४.०७.२०१९

<u>शिर्षक</u> :- स्वा.सावरकर प्रतिष्ठान संचलित अभिनव बालक मंदीर या शाळेतील मुख्याध्यापक श्री महादेव कृष्णा कुंभार, वय ५० वर्षे, रा. जुना बुधगांव रोड, पंचशिलनगर, सांगली यांनी शाळेतील शिक्षकांची लेखाधिकारी लेखा तपासणी पथक शिक्षण विभाग, सांगली यांचेकडुन वेतन पडताळणी करुन सेवापुस्तकावर स्टॅम्पींग करुन आणण्यासाठी २०००/-रुपये लाचेची मागणी करुन ती स्विकारले असता रंगेहात पकडले, सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | पुणे परिक्षेत्र, सांगली युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक | विश्रामबाग पोलीस स्टेशन, गुरनं २६७/२०१९ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८(सुधारीत २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| अरोपीचे नाव व कार्यालय | **श्री महादेव कृष्णा कुंभार, वय ५० वर्षे, मुख्याध्यापक, अभिनव बालक मंदीर, विश्रामबाग, सांगली, रा. "कृष्णालय" जुना बुधगांव रोड, माळी प्लॉट, पंचशिलनगर, सांगली, वर्ग-३** |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २०००/- रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे स्वा.सावरकर प्रतिष्ठान संचलित अभिनव बालक मंदीर, सांगली या शाळेमध्ये शिक्षक म्हणुन कार्यरत आहेत. सदर शाळेचे मुख्याध्यापक श्री. महादेव कृष्णा कुंभार यांनी शिक्षकांची वेतन पडताळणी लेखाधिकारी लेखा तपासणी पथक शिक्षण विभाग, सांगली यांचेकडुन करुन सेवापुस्तकावर स्टॅम्पींग करुन आणण्यासाठी शाळेतील शिक्षकांकडुन प्रत्येकी २०००/-रुपये लाचेची मागणी केली होती. त्यातील एका शिक्षकाने श्री महादेव कृष्णा कुंभार यांचे विरुध्द २०००/- रु लाच मागणीची तक्रार ला.प्र.वि. सांगली कार्यालयात दिली होती.<br>तक्रारदार यांनी दिले तक्रारीची पडताळणी दि. ३.७.२०१९ रोजी केली असता मुख्याध्यापक श्री. कुंभार यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांची वेतन पडताळणी करुन आणण्यासाठी २०००/-रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले होते.<br>त्यानंतर दि. ४.७.२०१९ रोजी श्री. महादेव कृष्णा कुंभार, मुख्याध्यापक यांचेविरुध्द लाचलुचपतीचपा सापळा लावला असता त्यांनी तक्रारदार यांची वेतन पडताळणी लेखाधिकारी लेखा तपासणी पथक शिक्षण विभाग, सांगली यांचेकडुन करुन सेवापुस्तकावर स्टॅम्पींग करुन आणण्यासाठी तक्रारदार यांचेकडे २०००/- रु लाचेची मागणी करुन ती स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. त्यांचेविरुध्द विश्रामबाग पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.शी** संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बदाम चौक, सांगली ,४१६४१६
संकेत स्थळ :- **acbmaharashtra.gov.in**
ई-मेल :- **acbwebmail@mahapolice.gov.in**
ऑनलाईन तक्रार अॅप :- **acbmaharashtra.net**
टोल फ्री क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२३३,२३७३०९५ व्हॉट्सअॅप क्रमांक :- ९८२३६१८००१